छत्रपती संभाजीनगरात डनहॅम-बुशच्या अत्याधुनिक एक्स्पिरियन्स सेंटरचे लोकार्पण



पान ४ वर

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

वर्ष -19, अंक-44 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 6 जुलै 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने -4

# जिल्हा बँकेवर महायुतीचा भगवा; २० पैकी १९ जागांवर विजय





**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्ह्याच्या सहकार राजकारणातील सर्वाधिक प्रतिष्ठेची मानली जाणारी छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अखेर महायुतीच्या ताब्यात गेली आहे. बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत महायुतीने दणदणीत काम गिरी करत एकूण २० पैकी तब्बल १९ जागांवर विजय मिळवला.

महाविकास आघाडीला केवळ खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या एकमेव जागेवर समाधान मानावे लागले. त्यामुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात महायुतीने निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. निवडणुकीपूर्वीच महायुतीने आठ उमेदवार बिनविरोध निवडून आणत विरोधकांना मोठा धक्का दिला होता. त्यानंतर झालेल्या १२ जागांच्या थेट लढतीतही महायुतीने ११ जागा जिंकत आपली रणनीती पूर्णतः यशस्वी ठरवली.

**दानवेंच्या विजयाची सर्वाधिक चर्चा** - या निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो म्हणजे शिवसेना (ठाकरे गट) आमदार अंबादास दानवे यांचा विजय. महायुतीच्या पॅनलमधून निवडणूक लढवत त्यांनी विजय मि ळवला. त्यांच्यासह कॅबिनेट मंत्री अतुल सावे, भाजप आमदार अनुराधा चव्हाण, शिवसेना आमदार संजना जाधव यांनीही विजय मिळवत आपले वर्चस्व कायम ठेवले.

**मतदानातून विजयी झालेले महायुतीचे उमेदवार** - अंबादास दानवे, अतुल सावे, अनुराधा चव्हाण, संजना जाधव, रवींद्र काळे, अर्जुन पाटील, रामराव शेळके, मुक्ता तांगडे, सुवर्णा जाधव, प्रभाकर काळे, शेषराव जाधव,आठ जण आधीच झाले होते बिनविरोध महायुतीने निवडणुकीपूर्वीच म ोर्चेबांधणी करत आठ उमेदवार बिनविरोध निवडून आणले होते. यामध्ये पालकमंत्री संजय शिरसाट, आमदार विलास भुमरे, रमेश बोरनारे, तसेच अर्जुन गाडे, अनिल बोरसे, अब्दुल समीर, दिनेश परदेशी आणि संदीप निकम यांचा समावेश आहे.

**मविआला मोठा धक्का** - महाविकास आघाडीने या निवडणुकीत जोरदार ताकद लावली होती. मात्र मतदारांनी त्यांना नाकारल्याचे निकालातून स्पष्ट झाले. मविआचे बहुतांश उमेदवार पराभूत झाले असून खासदार डॉ. कल्याण काळे हेच एकमेव उमेदवार विजयी ठरले. त्यामुळे जिल्हा बँकेवरील सत्तेची सूत्रे आता पूर्णपणे महायुतीच्या हाती गेली आहेत.

### सहकारातील नव्या राजकीय समीकरणांची नांदी

जिल्हा बँकेचा निकाल हा केवळ सहकार क्षेत्रापुरता मर्यादित नसून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि जिल्ह्यातील राजकीय समीकरणांवरही त्याचा मोठा परिणाम होणार असल्याचे मानले जात आहे. महायुतीने सहकार क्षेत्रात आपले संघटनात्मक बळ सिद्ध केले असून, विरोधकांसाठी हा निकाल मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. आता सर्वांचे लक्ष जिल्हा बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडीकडे लागले आहे.

## जीएसटी विभागाकडून कॅलिका स्टील अलॉयजचा गौरव; मराठवाड्यातील अग्रणी; करदात्यांमध्ये मानाचा सन्मान



**जालना (अट्टल मत प्रतिनिधी)**

केंद्रीय वस्तू व सेवा कर (जीएसटी) विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित जीएसटी वर्धापन दिनानिमित्त जालन्यातील कॅलिका स्टील अलॉयज प्रा. लि. या कंपनीचा मराठवाड्यातील अग्रणी करदाता म्हणून गौरव करण्यात आला.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कर अनुपालन (Tax Compliance) आणि शासनाच्या महसूल वाढीत दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल कंपनीचे संचालक उद्योगक भद्रप्रसाद गोयल यांना स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार विभागीय आयुक्त प्रदीप पुरुषोत्तम यांच्या हस्ते, अतिरिक्त आयुक्त राजशेखर केंद्रे तसेच सहआयुक्त रोहित निम्बेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी कॅलिका स्टील अलॉयजच्या पारदर्शक व्यावसायिक धोरणाचे, वेळेवर कर भरण्याच्या शिस्तीचे आणि शासनाच्या महसूल वाढीसाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले. कंपनीने सातत्याने कर नियमांचे पालन करून उद्योग क्षेत्रात आदर्श निर्माण केल्याचेही त्यांनी नमूद केले.

सन्मान स्वीकारताना उद्योगपती भद्रप्रसाद गोयल यांनी जीएसटी विभागाचे आभार मानत, भविष्यातही प्रामाणिकपणे कर अनुपालन करत देशाच्या आर्थिक विकासात आपले योगदान कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

हा सन्मान जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातील उद्योग क्षेत्रासाठी अभिमानाची बाब मानली जात असून, करदात्यांमध्ये प्रामाणिक कर भरण्याबाबत सकारात्मक संदेश देणारा ठरला आहे.

## सिंदोनच्या दादासाहेब शिंदेंना 'वसंतराव नाईक आधुनिक फुलशेती पुरस्कार'





**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिंदोन गावचे प्रगतशील शेतकरी दादासाहेब शिंदे यांना आधुनिक फुलशेती क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा 'वसंतराव नाईक आधुनिक फुलशेती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. मुंबईतील यशवंतराव चव्हाण केंद्र येथे झालेल्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात माजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

दादासाहेब शिंदे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून फुलशेतीमध्ये उत्पादनवाढ, दर्जेदार फुलांचे उत्पादन, जलसंधारण, ठिबक सिंचन, हरितगृह व्यवस्थापन आणि बाजारपेठेचे प्रभावी नियोजन या माध्यमातून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या नाविन्यपूर्ण प्रयोगामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा मार्ग मिळाला असून त्यांनी फुलशेतीला एक नवे व्यावसायिक स्वरूप दिले आहे. कृषी क्षेत्रातील सातत्यपूर्ण संशोधनवृत्ती, गुणवत्ता आणि शाश्वत शेतीचा आग्रह याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यापूर्वीही त्यांना विविध राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून, भारतीय कृषी संशोधन संस्थेकडून (IARI) देखील त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे. या गौरवामुळे देवळाई परिसरासह संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शेतकरी समुदायामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कृषी तज्ज्ञ, सामाजिक संस्था आणि शेतकरी बांधवांनी दादासाहेब शिंदे यांचे अभिनंदन करत त्यांच्या कार्यातून आधुनिक, तंत्रज्ञानाधारित आणि शाश्वत शेतीला अधिक चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# महिला शेतकऱ्यांना न्याय

राज्य सरकारमुळे महिला शेतकऱ्यांना आता खऱ्या अर्थाने न्याय मिळाला. शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरातील महिलांची आता स्वतंत्र ओळख निर्माण होणार आहे. कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पश्चात घर चालविण्यासाठी, संसार सांभाळण्यासाठी, घरातील मुले वाढविण्यासाठी घरातील महिलांनी शेतीवरच आपल्या संसाराचा गाडा हाकला आहे. पण आता महिला शेतकऱ्यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले आहे. सरकारकडे कागदोपत्रीही उल्लेख झाला आहे. येत्या काळात या निर्णयामुळे महिला शेतकऱ्यांच्या जीवनमानामध्ये त्याचा नक्कीच सकारात्मक बदल झालेला पहावयास मिळेल.

जिच्या हाताने बी पेरले, जिच्या घामाने माती ओली झाली, जिच्या कष्टातून शेत बहरले, त्या स्त्रीला आजवर 'शेतकरी' म्हणण्याचाही अधिकार नव्हता'. ही वस्तुस्थिती जितकी कटू, तितकीच लाजिरवाणी होती. भारतीय शेतीच्या इतिहासात स्त्रीचे योगदान अमूल्य असतानाही तिच्या श्रमांना अधिकृत ओळख नव्हती. ती शेतात राबायची, पीक उभे करायची, जनावरांची देखभाल करायची, कुटुंबाचा संसार आणि शेतीचा गाडा एकाच वेळी ओढायची; पण सरकारी कागदोपत्री तिची ओळख फक्त 'शेतकऱ्याची पत्नी' इतकीच मर्यादित राहिली. तिचे हात मातीने माखलेले होते, पण तिच्या नावावर शेतकरीपणाची नोंद नव्हती. अखेर उशिरा का होईना, महाराष्ट्र सरकारने महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. हा निर्णय केवळ एका नोंदणीचा विषय नाही; तो ग्रामीण स्त्रीच्या अस्तित्वाला मिळालेली अधिकृत मान्यता आहे. हा निर्णय म्हणजे अनेक दशकांच्या अन्यायावर उमटलेली दुरुस्तीची सही आहे. ही घोषणा केवळ प्रशासनाचा निर्णय नाही, तर सामाजिक परिवर्तनाचा प्रारंभ आहे.

भारतीय शेतीची खरी ताकद जर कुणी असेल, तर ती म्हणजे शेतकरी कुटुंब. त्या कुटुंबाचा सर्वात मोठा आधार म्हणजे महिला. पेरणीपासून कापणीपर्यंत, जनावरांच्या संगोपनापासून बियाण्यांच्या जतनापर्यंत, भाजीपाल्यापासून दुग्धव्यवसायापर्यंत प्रत्येक टप्प्यावर महिला आघाडीवर असते. अनेक वेळा पुरुष शहरांकडे मजुरीसाठी जातात आणि संपूर्ण शेतीची धुरा महिलांच्या खांद्यावर येते. तरीही समाजाने तिला 'मदतनीस' म्हणून पाहिले, 'शेतकरी' म्हणून नाही. ही विसंगती केवळ सामाजिक नव्हती; ती आर्थिक आणि प्रशासकीयही होती. शेतकरी म्हणून नाव नसल्यामुळे अनेक महिलांना सरकारी योजनांचा थेट लाभ मिळत नव्हता. पीकविमा, कृषी अनुदान, प्रशिक्षण, कर्ज, सल्ला, सन्मान या सर्व गोष्टींपासून त्या अप्रत्यक्षपणे दूर राहत होत्या. ज्या स्त्रीने शेती केली, तिच्याच नावावर तिचे अस्तित्व नव्हते. हा अन्याय अनेक वर्षे चालू राहिला. महाराष्ट्राने घेतलेला निर्णय या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा आहे. महिला शेतकऱ्यांची अधिकृत नोंद झाल्यामुळे शासनाकडे त्यांचा स्वतंत्र डेटा उपलब्ध होईल. यामुळे महिलांसाठी स्वतंत्र कृषी धोरणे आखता येतील. त्यांच्या गरजा ओळखून विशेष योजना राबविता येतील. कृषी क्षेत्रातील महिला नेतृत्वाला चालना मिळेल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शासनाच्या दृष्टीने महिला अदृश्य राहणार नाही.

या निर्णयाचा सर्वात मोठा लाभ म्हणजे स्वाभिमान. कष्ट करणाऱ्या स्त्रीला तिच्या कामाची अधिकृत ओळख मिळणे, हा तिच्या आयुष्यातील मोठा बदल आहे. 'मी शेतकऱ्याची पत्नी नाही, मी स्वतः शेतकरी आहे,' हे ती अभिमानाने सांगू शकेल. या एका वाक्यात स्त्रीच्या आत्मसन्मानाचा संपूर्ण इतिहास दडलेला आहे. सामाजिकदृष्ट्या हा निर्णय ग्रामीण भागातील महिलांचे स्थान अधिक उंचावणारा ठरेल. आजही अनेक गावांमध्ये महिलांच्या श्रमाला 'कर्तव्य' समजले जाते; त्याला आर्थिक मूल्य दिले जात नाही; परंतु अधिकृत ओळख मिळाल्यानंतर तिच्या कामाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्यास सुरुवात होईल. कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत तिचे मत अधिक महत्त्वाचे ठरेल. शेतीसंबंधी चर्चा, पीक नियोजन, बाजारपेठ, तंत्रज्ञान यामध्ये तिचा सहभाग वाढेल. आर्थिक परिणामही तितकेच दूरगामी असतील. कृषी योजनांमध्ये थेट लाभार्थी म्हणून महिलांचा समावेश होऊ शकेल. बँकिंग, कर्ज, स्वयंरोजगार, कृषी उद्योग, प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्या, महिला बचतगट आणि कृषी उद्योजकता यांसारख्या क्षेत्रात महिलांना नव्या संधी उपलब्ध होतील. ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यांचे योगदान अधिक दृश्यमान होईल. याहूनही महत्त्वाची बाब म्हणजे भविष्यातील धोरणनिर्मिती. शासनाकडे महिला शेतकऱ्यांची अचूक माहिती असल्यामुळे कृषी विकासाचा आराखडा अधिक वास्तववादी बनू शकतो. हवामान बदल, नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, जलव्यवस्थापन, कृषी यांत्रिकीकरण, कौशल्य प्रशिक्षण अशा अनेक क्षेत्रांत महिलांसाठी स्वतंत्र कार्यक्रम आखण्याचा मार्ग मोकळा होईल.

या निर्णयाचा परिणाम केवळ आजच्या महिलांपुरता मर्यादित राहणार नाही. तो पुढील पिढीवरही होईल. ग्रामीण भागातील मुलींना शेती हा सन्मानाचा व्यवसाय आहे, ही भावना निर्माण होईल. शिक्षण घेतलेल्या तरुणी शेतीकडे नव्या दृष्टिकोनातून पाहतील. कृषी उद्योजकता, अन्न प्रक्रिया, जैविक शेती, डिजिटल शेती यामध्ये महिलांचे नेतृत्व वाढेल. ग्रामीण भारताच्या विकासाला नवी दिशा मिळेल. मात्र, कोणताही निर्णय कागदावरच राहिला, तर त्याचे महत्त्व कमी होते. त्यामुळे या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक पात्र महिला शेतकऱ्याची नोंद झाली पाहिजे. तिला तिच्या अधिकारांची माहिती मिळाली पाहिजे. कृषी विभाग, महसूल विभाग, ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनाने समन्वयाने काम केल्यास या निर्णयाचा खरा लाभ ग्रामीण महिलांपर्यंत पोहोचेल. याचबरोबर समाजालाही आत्मपरीक्षण करावे लागेल. शेतातील कष्ट फक्त पुरुषांचे असतात, ही मानसिकता बदलावी लागेल. स्त्री ही मदतनीस नाही, ती समान भागीदार आहे, ही जाणीव स्वीकारावी लागेल. महिलांचा सन्मान हा केवळ भाषणांचा विषय न राहता व्यवहारात उतरला पाहिजे.

महाराष्ट्राने घेतलेला हा निर्णय इतर राज्यांसाठीही दिशादर्शक ठरू शकतो. भारतातील शेतीचे भवितव्य महिलांच्या सहभागाशिवाय घडू शकत नाही. त्यांना सन्मान, अधिकार आणि ओळख दिल्याशिवाय कृषी विकासाची संकल्पना अपूर्ण राहील. खरे तर हा निर्णय उशिरा झाला आहे. पण इतिहासात काही निर्णय उशिरा घेतले गेले, तरी त्यांचे महत्त्व कमी होत नाही. कारण ते केवळ वर्तमान बदलत नाहीत, तर भविष्यासाठी नवा मार्ग तयार करतात. महिला शेतकरी ही आजवर भारतीय शेतीची 'अदृश्य शक्ती' होती. आता ती अधिकृतपणे 'दृश्यमान' झाली आहे. तिच्या नावाची नोंद सरकारी अभिलेखात झाली असली, तरी प्रत्यक्षात ती ग्रामीण समाजाच्या नव्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेली आहे. शेतीला हातभार लावणाऱ्या स्त्रीला आता फक्त ओळख मिळालेली नाही, तर सन्मान मिळाला आहे. तिच्या श्रमाला नाव मिळाले आहे. तिच्या घामाला मूल्य मिळाले आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तिच्या अस्तित्वाला न्याय मिळाला आहे. यापुढे महाराष्ट्राच्या शेतात उगवणाऱ्या प्रत्येक पिकासोबत एक नवा विचारही रुजेल. 'शेती ही स्त्री-पुरुष दोघांची समान जबाबदारी आहे, आणि शेतकरी ही ओळखही दोघांची समान आहे.' हाच या निर्णयाचा खरा विजय आहे.

# सार्वजनिक पैसा आणि नागरिकांचे आत्मपरीक्षण

सरकारकडून अनेक अपेक्षा ठेवतो. चांगले रस्ते हवेत, दर्जेदार शिक्षण हवे, सरकारी रुग्णालयात उत्तम आरोग्यसेवा हवी, शेतकऱ्यांना मदत हवी, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती हवी, महिलांसाठी योजना हव्यात, ज्येष्ठ नागरिकांना आधार हवा आणि संकटाच्या काळात सरकारने तत्काळ धावून यावे, अशी आपली रास्त अपेक्षा असते. सरकारने पैसा कमी दिला तर आपण नाराज होतो. योजना उशिरा आली तर टीका करतो. लाभ मिळाला नाही तर प्रश्न विचारतो.

पण या सगळ्याच्या मध्यभागी असलेला एक साधा प्रश्न आपण फारसा विचारत नाही सरकारचा पैसा म्हणजे नेमका कोणाचा पैसा? उत्तर अगदी सोपे आहे. तो आपलाच पैसा आहे.

शासनाच्या तिजोरीत पैसा अचानक निर्माण होत नाही. नागरिकांनी भरलेले प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर, वस्तू आणि सेवांवरील कर, विविध शुल्क, शासनाच्या मालमत्तेतून मिळणारे उत्पन्न आणि इतर सार्वजनिक स्रोतांतून हा पैसा उभा राहतो. अगदी आयकर न भरणारा सामान्य नागरिकही बाजारातून एखादी वस्तू किंवा सेवा घेताना विविध प्रकारे करव्यवस्थेत योगदान देत असतो. त्यामुळे शासनाच्या तिजोरीतील पैसा कोणत्याही पक्षाचा, मुख्यमंत्र्यांचा, पंतप्रधानांचा किंवा मंत्र्यांचा वैयक्तिक पैसा नसतो. तो सार्वजनिक पैसा असतो.

मग सार्वजनिक पैशाच्या वापराबाबत जबाबदारी फक्त सरकारचीच आहे का?

सरकारने पारदर्शकता ठेवली पाहिजे. भ्रष्टाचार रोखला पाहिजे. योग्य योजना आखल्या पाहिजेत. पात्र लाभार्थी निवडले पाहिजेत. निधीचा अपव्यय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. या सर्व अपेक्षा योग्यच आहेत. पण नागरिक म्हणून आपली काहीच जबाबदारी नाही का?

आपल्या समाजात एक वाक्य सहज ऐकायला मिळते. सरकार देत आहे तर घ्या. दुसरा म्हणतो, आपण नाही घेतले तर दुसरा कोणीतरी घेईल. तिसरा म्हणतो, सरकारचेच पैसे आहेत. याच मानसिकतेचा आपण थोडा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. सरकारचे पैसे म्हणजे शेवटी आपलेच पैसे असतील, तर गरज नसताना एखाद्या सरकारी योजनेचा लाभ घेणे म्हणजे नेमके कोणाचे नुकसान करणे?

**सरकारचे की समाजाचे?**

शासन एखाद्या योजनेसाठी ठरावीक आर्थिक तरतूद करते. कोणत्याही योजनेसाठी पैसा अमर्याद नसतो. समजा एखाद्या योजनेसाठी शंभर कोटी रुपये उपलब्ध आहेत. त्यातून खरोखर गरजू असलेल्या एक लाख नागरिकांना मदत करायची आहे. पण त्या योजनेत पात्रतेच्या पळवाटा शोधून आणखी काही हजार आर्थिकदृष्ट्या सक्षम लोक घुसले, तर उपलब्ध पैसा त्यांच्यावरही खर्च होतो. परिणामी खऱ्या गरजूंच्या वाट्याला येणारी मदत कमी होऊ शकते.

म्हणजे अपात्र असूनही सरकारी लाभ घेणारा माणूस केवळ शासनाची फसवणूक करत नाही. तो कदाचित आपल्या गावातील, आपल्या शहरातील किंवा आपल्या समाजातील एखाद्या गरजू व्यक्तीच्या वाट्याची मदत कमी करत असतो.

ही जाणीव आपल्यामध्ये किती आहे?– महिलांसाठी योजना आली की पात्रतेचा विचार करण्यापूर्वी अर्ज करण्याची घाई होते. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आली की आर्थिक गरज आहे की नाही, यापेक्षा ङ्कआपल्याला मिळते का?ङ्क हा पहिला प्रश्न विचारला जातो. शेतकऱ्यांसाठी सवलत आली की आपले वास्तविक उत्पन्न आणि आर्थिक क्षमता बाजूला ठेवून कागदोपत्री पात्रता शोधली जाते. घरकुल, अनुदान, आरोग्य योजना किंवा इतर सरकारी लाभ असो. अनेकदा मला गरज आहे का? यापेक्षा मला मिळू शकते का? हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.

हे दोन प्रश्न दिसायला जवळचे आहेत; पण त्यांच्यात मोठा फरक आहे.

मला मिळू शकते का? हा कायदेशीर किंवा प्रशासकीय प्रश्न आहे. मला खरोखर गरज आहे का? हा नैतिक प्रश्न आहे.

आपल्या सार्वजनिक जीवनातील अनेक समस्या कदाचित या दुसऱ्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यामुळे निर्माण होत असाव्यात. आपण सरकारकडून शंभर टक्के प्रामाणिकपणाची अपेक्षा करतो. अधिकारी भ्रष्ट नसावा, मंत्री सार्वजनिक पैसा वाया घालवू नये, कंत्राटदाराने निकृष्ट काम करू नये आणि सरकारी कर्मचारी आपले काम प्रामाणिकपणे करावा, अशी आपली अपेक्षा असते. ती असलीच पाहिजे. पण स्वतःच्या बाबतीत सरकारी योजनेतील एखादी पळवाट दिसली की आपली भूमिका बदलते का?

खोटी किंवा अपूर्ण माहिती देऊन लाभ घेणे, वास्तविक उत्पन्न लपवणे, कुटुंबातील आर्थिक स्थिती वेगळी असताना कागदोपत्री पात्रता दाखवणे किंवा एकाच प्रकारच्या मदतीचा वेगवेगळ्या मार्गांनी लाभ घेण्याचा प्रयत्न करणेङ्कया गोष्टींकडे आपण अनेकदा फार गंभीरपणे पाहत नाही.

उलट असे करणाऱ्या व्यक्तीला काही वेळा हुशार किंवा चलाख म्हटले जाते. त्याला सगळ्या योजना माहिती आहेत.

तो सरकारी कामात हुशार आहे.

कुठून काय मिळवायचे हे त्याला बरोबर कळते. ही वाक्ये कौतुकाने बोलली जातात. पण हीच हुशारी जर एखाद्या गरजूच्या वाट्याचा पैसा कमी करत असेल, तर तिचे कौतुक करायचे की आत्मपरीक्षण?

सरकारचीही मर्यादा आहे. प्रत्येक नागरिकाच्या घरात जाऊन त्याची वास्तविक आर्थिक परिस्थिती तपासणे कोणत्याही शासनयंत्रणेला शक्य नाही. कागदपत्रे एक सांगतात आणि प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असू शकते. जमीन एका व्यक्तीच्या नावावर, उत्पन्न दुसऱ्याचे, व्यवसाय तिसऱ्याचा आणि सरकारी लाभ चौथ्या व्यक्तीच्या नावावर असू शकतो. संयुक्त कुटुंब आणि मालमत्तेच्या विभागणीमुळे काही परिस्थिती स्वाभाविकही असतात. त्यामुळे प्रत्येक प्रकरणाकडे संशयाने पाहणे योग्य नाही.

पण जाणीवपूर्वक व्यवस्थेतील पळवाटांचा वापर केला जात असेल, तर केवळ सरकारने पकडले नाही म्हणून ते योग्य ठरत नाही. कायदा आणि नैतिकता यांच्यात हाच फरक आहे.

वाहतूक पोलीस नाही म्हणून लाल दिवा तोडणे योग्य ठरत नाही. तिकीट तपासनीस नाही म्हणून विनातिकीट प्रवास योग्य होत नाही. त्याचप्रमाणे सरकारी यंत्रणेला आपली वास्तविक परिस्थिती समजली नाही म्हणून गरज नसताना सरकारी लाभ घेणे योग्य ठरत नाही.

आज तंत्रज्ञानामुळे परिस्थिती बदलत आहे. विविध शासकीय माहिती प्रणाली एकमेकांशी जोडल्या जात आहेत. आधार, बँक खाती, जमीन नोंदी, कराशी संबंधित माहिती आणि विविध योजनांच्या लाभार्थी नोंदी यांचा कायदेशीर चौकटीत अधिक प्रभावी वापर भविष्यात होईल. त्यामुळे चुकीची माहिती देऊन लाभ घेणे अधिक कठीण होईल.

**पण प्रत्येक समस्या तंत्रज्ञानाने सुटेल का?** – शासनाने आणखी एक संगणकीय प्रणाली तयार केली, आणखी एक पडताळणी सुरू केली आणि आणखी काही कागदपत्रे मागितली, तर त्याचा त्रास अनेकदा खऱ्या गरजू व्यक्तीलाच अधिक होतो. हुशार आणि माहिती असलेला माणूस नवीन मार्ग शोधतो. गरीब, अल्पशिक्षित आणि प्रशासकीय प्रक्रियेची माहिती नसलेला नागरिक मात्र आणखी एका कागदपत्रासाठी कार्यालयाच्या फेऱ्या मारतो. म्हणून प्रत्येक सरकारी योजनेभोवती संशयाची आणि कडक पडताळणीची भिंत उभी करणे हा एकमेव उपाय असू शकत नाही. समाजाचा प्रामाणिक सहभागही आवश्यक आहे.ज्याला मदतीची खरोखर गरज नाही, त्याने स्वतःहून मागे राहणे हीदेखील सामाजिक सेवा आहे. त्यासाठी व्यासपीठावर भाषण करण्याची गरज नाही. देणगी देण्याचीही गरज नाही. फक्त आपल्या वाट्याला येऊ शकणारा पण आपल्याला आवश्यक नसलेला सरकारी लाभ न घेणे, हीदेखील एका गरजू व्यक्तीला केलेली अप्रत्यक्ष मदत ठरू शकते.

आपल्या मुलांना आपण प्रामाणिकपणा शिकवतो. शाळांमध्ये मूल्यशिक्षण दिले जाते. महापुरुषांच्या विचारांवर भाषणे होतात. भ्रष्टाचाराविरोधात घोषणा दिल्या जातात. पण सार्वजनिक पैसा आणि सरकारी योजना यांच्याबाबत वैयक्तिक प्रामाणिकपणाची चर्चा किती होते?

कदाचित आता ती सुरू झाली पाहिजे.

गावातील ग्रामसभेत, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये, महिला बचत गटांमध्ये, शेतकरी बैठकीत आणि सामाजिक संस्थांमध्ये एक साधा विचार मांडला पाहिजेङ्क सरकारी योजना म्हणजे मोफत मिळणारा पैसा नाही. तो समाजाने समाजासाठी उभा केलेला पैसा आहे.

त्यावर पहिला हक्क सर्वाधिक गरजू व्यक्तीचा असला पाहिजे. आपल्याला पात्रता आहे म्हणून प्रत्येक लाभ घेणे आवश्यक नसते. एखाद्या योजनेचा लाभ न घेतल्याने आपण मूर्ख ठरत नाही. उलट आपल्यापेक्षा अधिक गरजू व्यक्तीसाठी सार्वजनिक निधीत आपला छोटासा वाटा शिल्लक ठेवत असतो.

सरकारला प्रश्न विचारलेच पाहिजेत. सार्वजनिक पैशाचा हिशेब मागितलाच पाहिजे. भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवलाच पाहिजे. कारण लोकशाहीत सरकार नागरिकांना उत्तरदायी आहे. पण सरकारला प्रश्न विचारताना स्वतःलाही एक प्रश्न विचारला पाहिजे.

मी सार्वजनिक पैशाशी किती प्रामाणिक आहे? – सरकारने काय केले, अधिकारी काय करतात आणि राजकारणी किती प्रामाणिक आहेत, यावर आपण तासन्तास चर्चा करतो. कदाचित कधीतरी स्वतःच्या वर्तनाचाही छोटासा हिशेब मांडला पाहिजे.

कारण सार्वजनिक पैसा वाचवण्याची जबाबदारी फक्त अर्थमंत्र्यांची नाही. ती प्रत्येक नागरिकाची आहे. शासनाची तिजोरी म्हणजे शेवटी समाजाची तिजोरी आहे. त्या तिजोरीतील एक रुपयाही चुकीच्या व्यक्तीकडे गेला, तर कुठेतरी एखाद्या गरजूच्या वाट्याचा एक रुपया कमी होतो. म्हणून सार्वजनिक पैशाच्या चर्चेत सरकारचे परीक्षण आवश्यक आहेच; पण नागरिकांचे आत्मपरीक्षणही तितकेच आवश्यक आहे. शेवटी एकच प्रश्न मला हा लाभ मिळू शकतो का? असे विचारण्यापूर्वी मला या लाभाची खरोखर गरज आहे का? असे आपण स्वतःला विचारू शकतो का?

**– डॉ. भारत कऱ्हाड,**
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय
दापोली, जिल्हा रत्नागिरी.

# कर्मचारी समाधान शिबिरातील तक्रारी संवेदनशीलतेने हाताळा - अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

विभागीय कर्मचारी समाधान शिबिरात शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी त्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी मांडतात. या तक्रारींवर नियमांनुसार तातडीने आणि संवेदनशीलतेने कार्यवाही करून त्यांचे निराकरण करावे, असे निर्देश अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित विभागीय कर्मचारी समाधान शिबिरात ते बोलत होते. यावेळी उपायुक्त (विकास/आस्थापना) दादाराव वानखेडे यांच्यासह तक्रारदार सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि जिल्हा परिषद येथील प्रत्येकी एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या सेवाकालातील पदोन्नती लाभासंदर्भातील तक्रारींची सुनावणी करण्यात आली. संबंधित विभागांनी या प्रकरणांवर तातडीने नियमानुसार कार्यवाही करावी, असे निर्देश श्री. परदेशी यांनी दिले. तसेच अर्जदारांच्या तक्रारींवर संवेदनशीलतेने काम करून शक्यतो एका महिन्याच्या आत त्या निकाली काढाव्यात, असेही त्यांनी सांगितले.



विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या विभागीय कर्मचारी समाधान शिबिरात विभागीय स्तरावरील तक्रारींचे निराकरण करण्यात येते.

मात्र, जिल्हास्तरावरील प्रकरणे विभागीय स्तरावर येण्याची वेळ येऊ नये, यासाठी संबंधित जिल्ह्यांनी तक्रारींचे प्रभावीपणे स्थानिक स्तरावरच निराकरण करावे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक अडचणी वेळेत सोडविण्यासाठी संबंधित विभागांनी पूर्ण क्षमतेने कार्य करावे, असेही श्री. परदेशी यांनी नमूद केले.

मराठवाड्यातील शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी जलद आणि कार्यक्षमतेने सोडविण्याच्या उद्देशाने विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण विभागात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'कर्मचारी समाधान शिबिर' आयोजित करण्यात येते.

# जैन विद्यार्थ्यांसाठी राज्यात सात ठिकाणी वसतिगृह उभारणार

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

जैन समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी मुंबई, नवी मुंबई, पुणेसह राज्यातील एकूण सात ठिकाणी वसतिगृहे उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाच्या संचालक मंडळाच्या चौथ्या बैठकीत घेण्यात आला. ही बैठक महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात पार पडली.

बैठकीत महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज व व्याज परतावा योजनांच्या सुधारित प्रारूपास मान्यता देण्यात आली. तसेच 'विहारधाम निर्माण योजना' आणि 'पाठशाळा आधुनिकीकरण व सक्षमीकरण योजना' राबविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ कडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या वसतिगृह उभारणीसंदर्भात प्राप्त मागण्यांचा विचार करून राज्यातील सात ठिकाणी विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

याशिवाय, 'मराठी जैन साहित्य विश्वकोष' निर्मितीसाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. कौशल्य विकास विभागाच्या सहकार्याने जैन युवकांना कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम तसेच इतर रोजगाराभिमुख योजनांचा लाभ मिळावा यासाठी विशेष अभियान राबिले जाणार असून महिला व बाल विकास विभागाच्या सहकार्याने महिला बचत गटांसाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्याबाबतही चर्चा झाली.

मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार महामंडळाच्या विविध योजनांमध्ये जैन समाजाचा अधिकाधिक सहभाग वाढावा, तसेच योजनांची माहिती समाजातील प्रमुख व्यक्तींपर्यंत पोहोचावी यासाठी नवी दिल्ली येथे विशेष बैठक आयोजित करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी पाठपुरावा करून जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळाकडून १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी नवी दिल्ली येथे झालेल्या सामंजस्य करारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. याबद्दल समन्वयक संदीप भंडारी यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला. उपस्थित सर्व सदस्यांनी हा ठराव एकमताने मंजूर करून अध्यक्षांच्या कार्याचे कौतुक केले.

बैठकीस अल्पसंख्याक विकास विभागाच्या सचिव माधवी खोडे-चवरे, अल्पसंख्याक विकास विभागाच्या व्यवस्थापकीय संचालक मेघना शिंदे, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यक्रम व्यवस्थापक गौरी दोंदे, वित्त विभागाच्या कार्यासन अधिकारी रचना तळेकर, कौशल्य विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद माळी, समन्वयक संदीप भंडारी, महामंडळाचे सदस्य रावसाहेब पाटील, सुनील पाटणी तसेच विकास अच्छा, अमित जैन, दर्शना जैन, विश्वजीत कोल्हापुरे आणि प्रशांत गौडाजे उपस्थित होते.

# महाकर्जमुक्ती योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना दिलासा; लाभ मिळेपर्यंत व्याज आकारू नये; शासन निर्णय निर्गमित

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

- राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे स्पष्ट आदेश सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने जारी केले आहेत.

मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार ३० जून २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर एकवेळ समझोता योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्यात आली असून, पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे, कर्जखात्यांचे पडताळणीकरण, आधार प्रमाणीकरण आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम संबंधित कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शासनाने नमूद केले आहे की, ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारल्यास त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. हे लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी लाभ मिळेपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या आदेशामुळे पात्र शेतकऱ्यांच्या थकबाकीत अनावश्यक वाढ होणार नसून, कर्जमुक्तीनंतर त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्याचाही मार्ग अधिक सुलभ होणार आहे. कर्जमुक्ती योजनेची पारदर्शक आणि परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, असे शासनाने आदेशात स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९अ अंतर्गत लोकहिताच्या दृष्टीने हा आदेश जारी करण्यात आला असून, योजनेतील कर्जमुक्ती व एकवेळ समजोता योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत पात्र थकीत कर्जावर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

# जिल्हा परिषद उपकरातून दिव्यांगांना वैयक्तिक लाभ

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्हा परिषदेच्या उपकर निधीतून राबविण्यात येणाऱ्या दिव्यांग कल्याण योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांकडून दि.३१ जुलै पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. ग्रामिण भागातील रहिवासी असलेल्या दिव्यांग व्यक्तिंनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहा.आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेच्या उपकरातून ५ टक्के निधी हा दिव्यांग कल्याणासाठी राखीव ठेवला जातो. या उपकर निधीतून सन २०२६-२७ करीता दिव्यांगांना वैयक्तिक लाभ देण्यात येणार आहे. ग्रामिण भागातील लाभार्थ्यांना हा लाभ देण्यात येणार असून १०० टक्के शासकीय अनुदान तत्त्वावर या योजना राबविण्यात येतात.त्यासाठी ग्रामिण भागातील रहिवासी असलेल्या पात्र लाभार्थ्यांकडून दि.३१ जुलै पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. उपकर निधीतून दिव्यांग व्यक्तिंना विनाअट घरकूल देणे, निराधार/ निराश्रीत अतितीव्र दिव्यांगांना विनाअट निर्वाह भत्ता देणे, अस्थिव्यंग व्यक्तिंना स्वयंचलित तीन चाकी सायकल (स्कूटर विथ अॅडाप्शन) डिव्हायसेस फॉर डेली लिव्हिंग, दिव्यांग व्यक्तिंचा बचत गटांना अनिदान देणे अशा योजना राबविल्या जातात.

आवश्यक कागदपत्रे- ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असल्याचे युडीआयडी प्रमाणपत्र, तहसिलदार यांनी दिलेले अधिवास/रहिवासी प्रमाणपत्र, यापूर्वी लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र, आधार कार्ड झेरॉक्स, घरकुलासाठी ८ अ चा उतारा, तहसिलदार यांनी दिलेला वार्षिक उत्पन्नाचा दाखला, स्कूटर विथ अॅडाप्शन साठी परिवहन अधिकारी यांचा परवाना/ अर्हक प्रमाणपत्र, बचत गटासाठी लाभ घ्यावयाचा असल्यास बचतगट नोंदणी प्रमाणपत्र (जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा किंवा महिला आर्थिक विकास महामंडळाने दिलेले.) ग्रामिण भागातील रहिवासी असलेल्या दिव्यांग व्यक्तिंनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहा.आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

# १२ वर्षांपासून रखडलेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या तपासाची उच्चस्तरीय चौकशीची मागणी करणार - आमदार अर्जुन खोतकर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

दैनिक गोकुळिनतीचे संपादक अर्पण कमलकिशोर गोयल यांनी २३ डिसेंबर २०१४ रोजी स्वतःवर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या प्रकरणाचा तपास गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तसेच विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी २ जुलै रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे लाक्षणिक उपोषणाचे आंदोलन करून इशाराही त्यांनी दिला यावेळी आमदार अर्जुन खोतकर यांच्या आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

अर्पण गोयल यांनी दिलेल्या निवेदनानुसार, २३ डिसेंबर २०१४ रोजी जालना येथे त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या घटनेनंतर जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३०४/२०१४ दाखल करण्यात आला असून आरोपींविरुद्ध गंभीर स्वरूपाची कलमे लावण्यात आली होती. मात्र, जवळपास बारा वर्षांचा कालावधी उलटूनही या प्रकरणाचा तपास पूर्ण झालेला नाही. आरोपींचा शोध लागलेला नसून त्यांना अटकही करण्यात आलेली नाही. त्यामुळे या तपासाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली मात्र, न्यायालयात पोलिसांनी एक शपथपत्र दाखल केल्या या तपासाला एका स्पेशल टीम निर्माण केला आहे असे शपथपत्र दाखल केला आहे पथकात कोणत्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली, त्यांनी आतापर्यंत कोणती कारवाई केली आणि तपासाची सद्यस्थिती काय आहे, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात आलेली नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. गोयल यांनी म्हटले आहे की, या प्रकरणात तपास अधिकाऱ्यांकडून गंभीर निष्काळजीपणा झाला असून त्यामुळे आरोपींना अभय मिळाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करून त्यांच्यावरही योग्य ती प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. याशिवाय प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया दिल्ली समितीसमोर ही हे प्रकरण मांडण्यात आले होते. समितीने पोलिसांकडून अहवाल मागविला होता. मात्र, पोलिसांनी समितीला योग्य व वस्तुनिष्ठ माहिती दिली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# गुत्तेदार सुशील खेडकर यांच्या हस्ते मृद व जलसंधारणचे मुख्य अभियंता हरिभाऊ गिते यांचा सत्कार







छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) - मृद व जलसंधारण विभागाच्या प्रशासनाला बळकटी देणारा महत्त्वपूर्ण निर्णय म्हणून छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण यांचे कार्यालय आजपासून अधिकृतपणे कार्यान्वित झाले. या कार्यालयाचे पहिले मुख्य अभियंता म्हणून हरिभाऊ गिते यांनी पदभार स्वीकारला. यावेळी गुत्तेदार तथा शिवसेनेचे माजी सभापती सुशील खेडकर यांच्या हस्ते त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना सुशील खेडकर यांनी सांगितले की, आतापर्यंत स्थानिक अधिकारी, कर्मचारी आणि गुत्तेदारांना विविध प्रशासकीय कामांसाठी वारंवार पुण्याला जावे लागत होते. मात्र, छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य कार्यालय सुरू झाल्याने वेळ, खर्च आणि श्रमांची मोठी बचत होणार आहे. हा निर्णय मराठवाडा आणि नाशिक विभागातील जलसंधारणाच्या विकासासाठी महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच हरिभाऊ गिते यांच्या अनुभवाचा लाभ विभागाला मिळेल आणि सर्व गुत्तेदारांकडून त्यांना आवश्यक ते सहकार्य दिले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

मृद व जलसंधारण विभागाच्या दि. २७ मे २०२६ च्या शासन निर्णयानुसार छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य अभियंता कार्यालयाची नव्याने स्थापना करण्यात आली आहे. या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागातील ८ आणि नाशिक प्रादेशिक विभागातील ५ असे एकूण १३ जिल्ह्यांचा समावेश असून, या माध्यमातून विभागातील जलसंधारणाच्या कामांना अधिक गती मिळणार आहे.

या प्रसंगी मृद व जलसंधारण आयुक्त प्रतिभा इंगळे, वाल्मीचे महासंचालक सुनील कुशिरे, जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय देवराज, वाल्मीचे सहसंचालक सुभाष कापगाते, जिल्हा जलसंधारण अधिकारी नरेंद्र कटके, मुख्य लेखा परीक्षक गणेश पाटील, उपअभियंता किरण चाबुस्कवार, धोडाराम कासले, गणेश मुळे, महेश निनाळे, पवन ठरले तसेच आयुक्तालय, वाल्मी, प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. वाल्मी परिसर, कांचनवाडी, पैठण रोड येथील नव्या कार्यालयातून आजपासून कामकाजाला सुरुवात झाली असून, या कार्यालयामुळे मराठवाडा व नाशिक विभागातील मृद व जलसंधारण योजनांच्या अंमलबजावणीला अधिक वेग मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# तुटलेल्या तारा, ट्रान्सफॉर्मर व विजेच्या खांबांपासून सावध राहा

## पावसाळ्यात विद्युत दुर्घटना टाळा; महावितरणचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पावसाळ्याला सुरुवात होताच वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसामुळे विद्युत दुर्घटनांचा धोका वाढतो. तुटलेल्या विजेच्या तारा, विजेचे खांब, ट्रान्सफॉर्मर, फिडर पिलर तसेच शॉर्ट सर्किटमुळे अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता असते. त्यामुळे विद्युत यंत्रणेपासून दूर राहून नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर यांनी केले आहे.

महावितरणने दिलेल्या माहितीनुसार, अतिवृष्टी आणि वादळामुळे विजेच्या तारा तुटणे, खांब कोसळणे, ट्रान्सफॉर्मरमध्ये ठिणग्या पडणे किंवा शॉर्टसर्किट होणे अशा घटना घडू शकतात. अशा वेळी लोंबकळणाऱ्या किंवा तुटलेल्या तारांना स्पर्श करू नये. ट्रान्सफॉर्मर, फिडर पिलर किंवा विजेच्या खांबाजवळ शॉर्टसर्किट झाल्यास त्या परिसरात जाणे टाळून तातडीने महावितरणला माहिती द्यावी.

पावसाळ्यात घरातील ओलसर विद्युत उपकरणे, शेती पंपावरील स्विचबोर्ड तसेच उघड्या विद्युत तारा यांच्यामुळेही अपघात होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी घर, सोसायटी आणि परिसरातील विद्युत यंत्रणा सुरक्षित असल्याची खात्री करून घ्यावी. पत्र्याच्या घरांमध्ये राहणाऱ्यांनीही आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. विजेच्या खांबांना जनावरे बांधू नयेत किंवा दुचाकी टेकवून ठेवू नयेत, तसेच पूरस्थितीत नदीकाठच्या भागात विशेष दक्षता घ्यावी. भूमिगत वीजवाहिन्यांमध्ये पाणी शिरणे, झाडे कोसळणे किंवा वीज पडल्याने वीजपुरवठा खंडित होण्याबरोबरच जीवितास धोका निर्माण होऊ शकतो.

**येथे साधा संपर्क** - अतिवृष्टी, वादळ किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे वीजवाहिन्या तुटणे, खांब कोसळणे अथवा विद्युत दुर्घटनेची शक्यता निर्माण झाल्यास अथवा कोणतीही धोकादायक घटना आढळल्यास नागरिकांनी त्याची माहिती महावितरणच्या मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्राशी १९१२ या हेल्पलाईन क्रमांकावर किंवा १८००-२१२-३४३५ व १८००-२३३-३४३५ या टोल-फ्री क्रमांकांवर किंवा स्थानिक नियंत्रण कक्षाच्या ७०६६०४२४१२ (छत्रपती संभाजीनगर शहर मंडल), ७८७५७५६६५२ (छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडल) व ७८७५७६४१४४ (जालना मंडल) या क्रमांकांवर तात्काळ द्यावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## 130 वर्षाच्या जागतिक वारशाची मराठवाड्यात दमदार एंट्री

# छत्रपती संभाजीनगरात डनहॅम-बुशच्या अत्याधुनिक एक्स्पिरियन्स सेंटरचे लोकार्पण

### कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत नवी VRF एसी मालिका लाँच, डीलर्स-आर्किटेक्ट मेळावा उत्साहात

छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी

जागतिक स्तरावर वातानुकूलन क्षेत्रात 130 वर्षाचा गौरवशाली वारसा असलेल्या डनहॅम-बुश या आंतरराष्ट्रीय कंपनीने छत्रपती संभाजीनगर येथे अत्याधुनिक VRF एक्सप्रिन्एन्स सेंटरचे मोठ्या उत्साहात उद्घयाटन केले. याप्रसंगी नवी वातानुकूलन उत्पाद्ने लॉन्च तसेच डीलर्स-आर्किटेक्ट पार पडला.

#### प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती

महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. माजी आमदार संजय केणेकर यांच्या हस्ते सेंटरचे उद्घयाटन झाले. डनहॅम-बुश इंडियाचे कंट्री जनरल मॅनेजर दीपांकर भट्ठाचार्य यांची प्रमुख उपस्थिती लाभली.








#### नवीन उत्पादनांचे लॉन्च

VRF Full DC Inverter, Maxes आणि ACE आउटडोअर युनिट्स, SMART 365 फ्लोअर स्टँडिंग एसी, विविध इनडोअर युनिट्स तसेच Comfort Line लाईट कमर्शियल एसी यांचा समावेश आहे. ऊर्जा बचत, उच्च कार्यक्षमता पर्यावरणपूरक तंत्रज्ञानावर भर देण्यात आला.

#### जागतिक प्रवासाचा आढावा

कंपनींच्या 1894 पासूनच्या जागतिक प्रवासाची माहिती देण्यात आली. स्क्रू कंप्रेसर, मॅग्नेटिक बेअरिंग चिलर, डेटा सेंटर चिलर यांसारख्या नवकल्पनांची माहिती यावेळी देण्यात आली.

#### डीलर-आर्किटेक्ट संवाद

ऊर्जा कार्यक्षम प्रणाली, हरित इमारती, स्मार्ट बिल्डिंग संकल्पना आणि ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी डीलर्सची भुमिका यावर सखोल चर्चा झाली.

#### एक्सप्रिएन्स सेंटरचे आकर्षण

नवीन सेंटरमध्ये विविध एसी प्रणालींचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे.

#### कार्यक्रमाची वैशिष्टचे

- 130 वर्षांची जागतिक परंपरा असलेल्या डनहॅम-बुशची मराठवाड्यात दमदार उपस्थिती
- अत्याधुनिक VRF एक्सप्रिन्एन्स सेंटरचे उद्घयाटन
- नवीन VRF Full DC Inverter व SMART 365 एसी मालिकेचे लॉन्च
- डीलर्स, आर्किटेक्ट, बिल्डर्स व HVAC तज्ज्ञांचा मोठा सहभाग
- ऊर्जा बचत आणि पर्यावरणपूरक वातानुकूलन तंत्रज्ञानावर विशेष भर

मराठवाडा आणि परिसरात ऊर्जा कार्यक्षम, आधुनिक व विश्वासार्ह वातानुकूलन उपाय उपलब्ध करुन देण्यासाठी जाट टेक्नोक्राफ्ट प्रा. लि. कटिबद्ध.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199